**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)**

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील रिक्त असलेली खालील पदे नियमित वेतनश्रेणीत भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर त्यांचे अर्ज दि.११/३/२०१४ ते दि.२०/३/२०१४ पर्यत मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका भवन, चंदनवाडी, अल्मेडा रोड, पांचपाखाडी, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर ऑनलाईन पध्दतीने संपूर्ण तपशीलासाह पाठवावे. तसेच ऑनलाईनव्दारे अर्जासोबत नमुद केलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. ठाणे महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये सादर केलेल अर्ज तसेच पोस्टाने पाठविलेले अर्ज आणि मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**अ) शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या | वेतन बँड + ग्रेड पे | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १) | बिगारी (पा.पु.) | तत्सम् कामाचा अनुभव | ५२ | रु.५२००-२०२००+ १८०० | जाहिरातीमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे |
| २) | पाणी खाते फिटर | एसएससी, आयटीआय कोर्स पास | ४३ | रु.५२००-२०२००+ २००० | |
| ३) | वायरमन | आयटीआय इलेक्ट्रीशियन ट्रेंड/ ३ वर्षाचा अनुभव किंवा वायरमन लायसन व कामाचा ५ वर्षांचा अनुभव | १८ | रु.५२००-२०२००+ २००० | |
| ४) | स्लुसमन | तत्सम् कामाचा अनुभव | ९४ | रु.५२००-२०२००+ १८०० | |

**ब) पदांचा तपशिल**

१.पदनाम :- बिगारी (पा.पु.)

| अ. क्र. | प्रवर्ग | आवश्यक | भरलेले | रिक्त | सर्व साधारण | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | महिला | भुकंप ग्रस्त | अंश कालीन | खेळाडू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जात | ३२ | ८२ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २) | अनु.जमात | ८९ | ६४ | २५ | ०९ | ०४ | ०१ | ०७ | ०१ | ०२ | ०१ | २५ |
| ३) | विजा-अ | १२ | ०४ | ०८ | ०४ | ०१ | - | ०२ | - | ०१ | - | ०८ |
| ४) | भज-ब | १० | १७ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५) | भज-क | १५ | ११ | ०४ | ०२ | ०१ | - | ०१ | - | - | - | ०४ |
| ६) | भज-ड | ०८ | ०९ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७) | विमाप्र | ०८ | ०९ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ८) | इमाव | ३६ | ७७ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ९) | खुले | १९५ | ८० | ११५-१००= १५ | ०६ | ०२ | ०१ | ०४ | - | ०१ | ०१ | १५ |
| | एकूण | ४०५ | ३५३ | ५२ | २१ | ०८ | ०२ | १४ | ०१ | ०४ | ०२ | ५२ |

२.पदनाम :- फिटर

| अ. क्र. | प्रवर्ग | आवश्यक | भरलेले | रिक्त | सर्व साधारण | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | महिला | भुकंप ग्रस्त | अंश कालीन | खेळाडू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जात | ०४ | ०१ | ०३ | ०१ | ०१ | - | ०१ | - | - | - | ०३ |
| २) | अनु.जमात | १० | - | १० | ०३ | ०१ | ०१ | ०३ | - | ०१ | ०१ | १० |
| ३) | विजा-अ | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ४) | भज-ब | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ५) | भज-क | ०२ | - | ०२ | - | ०१ | - | ०१ | - | - | - | ०२ |
| ६) | भज-ड | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ७) | विमाप्र | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ८) | इमाव | ०३ | - | ०३ | ०२ | - | - | ०१ | - | - | - | ०३ |
| ९) | खुले | २१ | - | २१ | ०९ | ०३ | - | ०६ | - | ०२ | ०१ | २१ |
| | | ४४ | ०१ | ४३ | १९ | ०६ | ०१ | १२ | - | ०३ | ०२ | ४३ |

३.पदनाम :- वायरमन

| अ. क्र. | प्रवर्ग | आवश्यक | भरलेले | रिक्त | सर्व साधारण | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | महिला | भुकंप ग्रस्त | अंश कालीन | खेळाडू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जात | ०२ | - | ०२ | ०१ | - | - | ०१ | - | - | - | ०२ |
| २) | अनु.जमात | ०६ | ०१ | ०५ | ०२ | ०१ | - | ०१ | - | ०१ | - | ०५ |
| ३) | विजा-अ | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४) | भज-ब | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ५) | भज-क | ०१ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ६) | भज-ड | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७) | विमाप्र | - | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ८) | इमाव | ०२ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ |
| ९) | खुले | १२ | ०३ | ०९-०१ = ०८ | ०४ | ०१ | - | ०२ | - | ०१ | - | ०८ |
| | एकूण | २५ | ०७ | १८ | १० | ०२ | - | ०४ | - | ०२ | - | १८ |

४.पदनाम :- स्लुसमन

| अ. क्र. | प्रवर्ग | आवश्यक | भरलेले | रिक्त | सर्व साधारण | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | महिला | भुकंप ग्रस्त | अंश कालीन | खेळाडू | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनु.जात | ०८ | - | ०८ | ०४ | ०१ | - | ०२ | - | ०१ | - | ०८ |
| २) | अनु.जमात | २२ | ०२ | २० | ०७ | ०३ | ०१ | ०६ | - | ०२ | ०१ | २० |
| ३) | विजा-अ | ०३ | - | ०३ | ०२ | - | - | ०१ | - | - | - | ०३ |
| ४) | भज-ब | ०२ | - | ०२ | ०१ | - | - | ०१ | - | - | - | ०२ |
| ५) | भज-क | ०३ | - | ०३ | ०२ | - | - | ०१ | - | - | - | ०३ |
| ६) | भज-ड | ०२ | - | ०२ | ०१ | - | - | ०१ | - | - | - | ०२ |
| ७) | विमाप्र | ०२ | - | ०२ | ०१ | - | - | ०१ | - | - | - | ०२ |
| ८) | इमाव | ०९ | ०१ | ०८ | ०४ | ०१ | - | ०२ | - | ०१ | - | ०८ |
| ९) | खुले | ४७ | ०१ | ४६ | १५ | ०७ | ०२ | १४ | ०१ | ०५ | ०२ | ४६ |
| | एकूण | ९८ | ०४ | ९४ | ३७ | १२ | ०३ | २९ | ०१ | ०९ | ०३ | ९४ |

**क) वयोमर्यादा :-**

- उमेदवाराचे दि.२०/०३/२०१४ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षपेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाची शिथीलता)
- माजी सैनिकांसाठी त्यांनी सशस्त्र दलात केलेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्ष इतकी वयोमर्यादा राहील.
- खेळाडू उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथील.
- पदवीधर अंशकालीन उमेदवारासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.२६/८/२००५ अन्वये पदवीधर अंशकालीन म्हणून किमान ३ वर्ष काम केलेल्या व तीन वर्षाच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंद केलेल्या अंशकालीन पदवीधर उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.
- अ) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य ब) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व क) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील.
- प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.
- शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.१ नोव्हेंबर २००३ नुसार नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता वयाची अट पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५/५०पर्यंत राहील.

**ड) निवडीचे निकष :-**

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ठामपा/२२९६/१३५२/प्र.क्र.१९८/नवि-२३, मंत्रालय, दिनांक ३१ जानेवारी २००० च्या निर्णयाप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात प्रत्यक्ष त्या-त्या पदावर अगोदर काम करीत असलेल्या कर्मचा-यांना प्राधान्य.

२. उपरोक्त पदासाठी अपेक्षित अनुभव हा शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील किमान १०० द.श.लि. किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या पाणीपुरवठा योजनेमधील काम करण्याचा अनुभव असे अभिप्रेत आहे,

३. ज्या उमेदवारांकडे १० वर्षापेक्षा जास्त अनुभव असेल त्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रथम प्राधान्याने बोलाविण्यात येईल. त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास कमी अनुभव असलेल्या उमेदवारांस टप्प्या-टप्प्याने मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.अनुभवासाठी ८० गुण आणि मुलाखतीसाठी २० गुण असे एकूण १०० गुण निश्चित करण्यात आलेले आहेत.
अ) अनुभवाकरीता फक्त पुर्ण महिन्याचा कालावधी विचारात घेण्यात येईल. व अनुभव हा तीन महिन्यांच्या पटीमध्ये ग्राहय धरण्यात येईल.
ब) प्रती दर तीन महिन्याच्या अनुभव कालावधीसाठी २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ८० गुण अनुभवासाठी धरण्यात येतील.

**अनुभवासाठी सादर करावयाचे प्रमाणापत्राचा नमुना**

१. मी श्री. / श्रीमती ------------------------------------- लिहून देतो की , मे. -------------------------------------------- ---------- या संस्थेमार्फत (संस्थेचे नाव-★ शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था) संस्थेच्या किमान १०० द.श.लि. किंवा त्यापेक्षा अधिक क्षमता असलेल्या जलकुंभ/जलवाहिनी योजनेच्या कामावर -------------- म्हणून दि. ------------पासून दि. ---------------- पर्यंत काम करीत आहे / केलेले आहे.

स्वाक्षरी,

(उमेदवाराचे नांव )

१. असे प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री. ----------------------------------- यांनी -------------- म्हणून मे. ----------------- --- या संस्थेमार्फत (संस्थेचे नाव-★ शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था) संस्थेच्या किमान १०० द.श.लि. किंवा त्यापेक्षा अधिक क्षमता असलेल्या जलकुंभ/जलवाहिनी योजनेच्या कामावर --------------म्हणून दि. ------------- पासून दि. ---------------- पर्यंत काम करीत आहे / केलेले आहे.

स्वाक्षरी,

★ येथे संबंधीत शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव टाकावे.

(विभागप्रमुखाचे नांव, पदनाम)
★ (शासकीय / निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा शिक्का)

**इ) अटी व शर्ती :-**

१) जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

२) महिला/माजी सैनिक/खेळाडू/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन या समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षण विरहित म्हणून भरली जातील .

३) शासन निर्णय क्रमांक ठामपा-२२९६/१३५२/प्र.क्र.१९८/नवि २३,मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक ३१ जानेवारी २००० तसेच मा.महासभा ठराव क्रमांक ५६ दिनांक २३/०६/२०११ अन्वये जाहिरातीमध्ये नमुद पदांवर प्रत्यक्ष भरती करतांना सदर पदावर अगोदर ठाणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात काम करीत असलेल्या कर्मचा-यांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात येईल तसेच अनुज्ञेय वयापेक्षा जास्त वय धारकास वयाचे धारतेबाबत वयक्षेपन करण्यात येईल.

४) अनुभवाचा कालावधी नुसार मिळालेले एकूण गुण जर समान असतील तर ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेवर काम केलेले व त्यानंतरही समान गुण असल्यास वयाने जेष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

५) उमेदवाराने सादर केलेला जातीचा, अनुभवाचा दाखला अथवा इतर कोणताही दाखला बोगस आढळुन आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकेल व त्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारावर राहील.

६) उमेदवारांनी जाहिरातीला अनुसरुन आपले अर्ज व अनुभवाचा दाखला ऑनलाईन पध्दतीने दि.११/३/२०१४ ते दि.२०/३/२०१४ पर्यंत अपलोड क रावेत. ऑनलाईन प्रक्रियेशिवाय केलेले अर्ज नाकारण्यात येतील.

७) (i) शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि.२७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

a. (ii) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

b. (iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

८) प्राथमिक संगणीकृत छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत अशा उमेदवारांमधुन उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

९) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (caste certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (caste validity certificate) साक्षांकीत प्रत मुलाखतीचे वेळेस अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

१०) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय/परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याचा दिनांकापासुन ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यांत येईल.

११) मुलाखत ठाणे महानगरपालिकेचे दादोजी कोंडदेव क्रिडाप्रेक्षागृह, खारटन रोड, ठाणे येथे आयोजित करण्यात येईल. त्याबाबतची महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१२) अंशकालीन, पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

१३) सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्र.पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ दिनांक २६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१४) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/५/२००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दि.३१/३/२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

१५) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/३/२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.१/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८/३/२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

१६) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.३०/४/२००५ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय (शासन निर्णय परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे. खुल्या प्रवर्गातील खेळाडूंना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१/३/२०१४ या दिनांकापर्यत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

१७) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा.उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Cremy-layer Certificate) दिनांक ३१-३-२०१४ पर्यंत वैध असलेले इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. साक्षांक्ति प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

१८) वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिका-याचे जात व दिनांक ३१/३/२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

१९) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

२०) (अ) भूकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हाधिकारी) यांचे भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे.

a.(ब) प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी संबंधित जिल्हाधिकारी अथवा जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे व तशी नोंद फॉर्म भरताना संबंधीत रकान्यात करणे आवश्यक आहे. म्हणजेच अर्जदार यांचेकडे अर्जाच्या दिनांकास त्याचे नावे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२१) नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १/११/२००५ नुसार लागु करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागु राहील.

२२) अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीमुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येईल. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधीत उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

२३) उमेदवाराने अनुभव व मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवडयादी तयार केली जाईल. अंतरिम निवडयादी मधून पदांच्या सामाजिक/समांतर आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

२४) विहित वयोमर्यादेतील शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांने त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावीत व अर्जामध्ये सध्या कार्यरत असलेले पद व कार्यालयाचा पत्ता नमुद करावा. अर्जासोबत संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

२५) जर उमेदवार एकापेक्षा अधिक समांतर आरक्षणात मोडत असतील तर त्यांनी त्या सर्वांची नोंद फॉर्म भरताना करावी.

२६) दि.२०/३/२०१४ या दिवशी उमेदवाराचे वय वयोमर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

२७) स्थानिक पोलिस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा.

२८) शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.

२९) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३०) नियुक्तीपुर्वी निवड झालेल्या उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे व कागदपत्रांची पडताळणी तज्ञ व्यक्तींकडून करण्यात आल्यानंतरच नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

३१) जे अर्जदार भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरणार नाहीत अशा अर्जदारांना याबाबत वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही आणि अर्जदारास त्याबाबत विचारणा करता येणार नाही. उमेदवारांनी ठा.म.पा.संकेतस्थळावरुन www.thanecity.gov.in माहिती घ्यावी.

३२) सदर नियुक्त्यांसाठी परिविक्षाधिन कालावधी दोन वर्षांचा राहील. सदरचा परिविक्षाधीन कालावधीमध्ये वाढ करणे अथवा सेवा संपुष्ठात आणणे याबाबतचा अधिकार महापालिकेने राखून ठेवलेला आहे.याबाबत कोणत्याही उमेदवारास तक्रार अथवा वाद करता येणार नाही.

३३) महिलांसाठी आरक्षित असलेल्या त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येईल.

३४) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३५) सदर जाहिरातीनुसार भरती स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे , प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

३६) उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

३७) एखादया अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

३८) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल/शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

**फ) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

**१) नोंदणी :-**

अ) जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

ब) ऑनलाईन अर्ज www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ११.०३.२०१४ पासून २०.०३.२०१४ पर्यंत उपलब्ध राहील.

क) ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईनवर अर्ज भरणार आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपुर्वक वाचावी.लहान कुटूंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ड) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्टसाईज फोटो, स्कॅन केलेली सही व विहित केलेला अनुभवाचा दाखला स्वतःजवळ असलेची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी फोटो, सही व अनुभवाचा दाखला स्वतंत्र स्कॅन करुन अपलोड करावा. उमेदवाराचा फोटो, सही व अनुभव प्रमाणपत्रा व्यतिरिक्त कोणत्याही प्रमाणपत्र/ अभिलेख्यांची सॉफ्ट कॉपी अर्ज भरतांना सोबत जोडावयाची (upload करण्याची) आवश्यकता नाही.

इ) ऑनलाईन अर्ज करणेसाठी उपरोक्त संकेतस्थळावर Apply online या लिंकवर क्लीक करुन अर्ज भरणेस सुरुवात करावी.

फ) आपल्यास अर्ज करावयाचे पद व अनुषंगिक माहिती उपलब्ध पर्यायांमध्ये भरा (उदा.वय, शिक्षण, अनुभव इ.) त्या आधारे संगणक प्रणाली तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

ग) आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा नोंदणी क्रमांक निर्माण करुन तुम्हाला स्क्रीनवर दाखवेल आणि तुम्ही पुरविलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस करेल.(कृपया आपला मोबाईल क्रमांक अचुक नमुद करावा) तुमचा नोंदणी क्रमांक म्हणजे तुमचा अर्ज क्रमांक असेल.

ह) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असली तरी वरील पदासाठी स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

ज) उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वीत असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक व ई मेल आयडी नमुद करावा. जेणेकरुन आपापसांत संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

**ल) ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी - दि.११/३/२०१४ ते दि.२०/३/२०१४ रात्रौ ११.०० वाजेपर्यंत राहील.**

म) वर दिलेल्या विहित वेळेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया काढुन टाकण्यात येईल.

**२) छायाचित्र, सही व अनुभव प्रमाणपत्र अपलोड करण्याची प्रक्रिया :-**

अ) छायाचित्र - उमेदवाराने स्कॅन केलेले छायाचित्र अर्जावर निश्चित केलेल्या जागेवर अपलोड करावे. (छायाचित्राचे मोजमाप-५० KB)

ब) सही - उमेदवाराने स्कॅन केलेली सही अर्जावर निश्चित केलेल्या जागेवर अपलोड करावी. (सहीचे मोजमाप - २० KB)

क) अनुभवाचे प्रमाणपत्र - उमेदवाराने स्कॅन केलेले अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जावर निश्चित केलेल्या जागेवर अपलोड करावे. (अनुभवाच्या प्रमाणपत्राचे मोजमाप- १०० KB)

**३) भरलेल्या माहितीची खात्री करणे :-**

अ) उमेदवाराने ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर अर्जाची प्रिंट स्वतः काढावी व आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ब) अर्जदाराने नियमितपणे उपरोक्त नमूद संकेतस्थळास भेट द्यावी. Online अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून पाठविण्याची आवश्यकता नाही.

क) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या उमेदवारांची माहिती अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध राहील.

ड) अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण . www.thanecity.gov.in

इ) अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतुन काढून टाकणेस पात्र राहील व भा.दं.वि.संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

फ) भरती बाबत कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया सुरु झाल्यास याबाबत न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

ग) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी असल्यास त्यांनी www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

ठिकाणः ठाणे
दिनांक :

महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.